महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह POINT

शनिवार, २६ मार्च २०११



देवळांच्या गावा

# वारसा मठांचा

डॉ.तुषार यशवंत सावडावकर

**बाणगंगा तलावाच्या परिसरात जशी मंदिरं आहेत, तसेच काही मठही आहेत. अर्थात या मठांनाही अनेक वर्षांची परंपरा आहे आणि मंदिरांप्रमाणे तिथेही अनेक उत्सव साजरे केले जातात. या उत्सवांना तसंच एरव्हीही इथे येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे.**

## वाळकेश्वर काशी मठ

वाळकेश्वर काशी मठ हा बाणगंगेच्या तलावाजवळ आहे. माधवेंद्र तीर्थ स्वामी हे १५४०च्या शतकात काशी इथे स्थापन झालेल्या वैष्णव संन्यासी मठाचे प्रमुख होते. त्यांनी १७७५ मध्ये बाणगंगा इथे जिवंत समाधी घेतली. त्याचबरोबर वरेंद्र तीर्थ स्वामीजी यांचीदेखील इथे समाधी आहे. यानंतर गौड सारस्वत ब्राह्मण(वैष्णव) यांनी इथे समाधीमठाची स्थापना केली.



माधवेंद्र स्वामींच्या समाधीवर एक काळ्या दगडाची तीन फूट उंचीची भक्त हनुमानाची मूर्ती आहे. ही मूर्ती पश्चिम दिशेला असून ती उत्तराभिमुख आहे. मूर्तीभोवती चांदीचा देव्हारा आहे. त्या देव्हाऱ्यावर अनेक शुभचिन्हं कोरलेली आहेत. तसंच मारुतीजवळ चांदीची गदा असून देव्हाऱ्याच्या खालच्या बाजूला दोन सिंह तसंच सूर्य व ओम हे अक्षर चांदीमध्ये कोरलेलं आहे. गाभाऱ्यामध्ये अनेक दीप प्रज्वलित केलेले दिसतात. मंदिराच्या गाभाऱ्याच्या मागे विठोबाची पश्चिमाभिमुख, काळ्या रंगाच्या दगडी मूर्ती असून त्याचा मंडपदेखील चांदीचा आहे. याच मठात श्रीमंत सुक्रतीन्द्र तीर्थ स्वामीजीचा सुरेख पुतळा आहे.

मठातली दुसरी पवित्र जागा 'महाभारत' या काव्य रचणाऱ्या वेद व्यास यांना अर्पण केली आहे. जेव्हा या मठाचे मठाधिपती येतात तेव्हा वेदव्यास महर्षी, गुरुमूर्ती व लक्ष्मीनृसिंह आदी मूर्तींची पूजा केली जाते.

काशीमठ सकाळी ७ वाजता दर्शनासाठी उघडला जातो व दुपारी १ वाजता बंद केला जातो. त्यानंतर परत संध्याकाळी ६ वाजता उघडला जातो व रात्री ८.३० वाजता बंद होतो. सकाळी ९.३० वाजता, दुपारी १२.३० व रात्री ८ वाजता आरती व पूजा होते. येणारे भाविक पूजेसाठी नारळाचा प्रसाद चढवतात. नारळामध्ये पंचामृत टाकून तो प्रसाद स्वरूपात परत दिला जातो.

या मठामध्ये वर्षातून दोन उत्सव साजरे केले जातात. श्रावण महिन्यात श्रावण सप्ताह साजरा केला जातो. त्यावेळी इथे अहोरात्र भजन चालू असतं. वेगवेगळी भजन मंडळी या कार्यक्रमाला हजेरी लावतात. भजन अजिबात खंड न पाडता अहोरात्र चालू असतं, हे विशेष. दुसरा उत्सव कार्तिक महिन्यात समाधी स्थापनेच्या दिवशी असतो. या वेळेस गौड सारस्वत ब्राह्मण समाजाचे लोक एकत्र येऊन दुपारी भोजन म्हणून प्रसाद ग्रहण करतात व रात्री पालखीची मिरवणूक काढली जाते.

## श्री गौडपादाचार्य संस्थान कवळे मठ

मुंबई शहरात मलबार हिलवर वालुकेश्वर इथे बाणगंगेच्या सान्निध्यात श्री गौडपादाचार्य हा सुंदर मठ आहे. हा मठदेखील प्राचीन आहे. या मठाजवळ वैष्णव सांप्रदायी काशीमठाची इमारत असून त्याच्याशेजारी श्री वालुकेश्वर देवालय आहे. या मठाची जुनी इमारत मोडकळीस आल्यामुळे ती नवीन पद्धतीने बांधण्याचं मनात आणून श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी(७५) यांनी या बांधकामाला प्रारंभ केला. या मठ बांधणीची पायाभरणी- शिलान्यास काशीमठाधिश श्री सुधीद्रतीर्थ स्वामी महाराजांच्या हस्ते दि. २८ फेब्रुवारी १९६३ रोजी झाला. बांधकाम पूर्ण झाल्यावर दि. २८ मे १९६७ वैशाख शुद्ध पंचमी या दिवशी श्री सुधीद्रतीर्थ स्वामी महाराजांच्या हस्ते या मठाचा अनावरणविधी करण्यात आला.

मठामध्ये मध्यभागी आधुनिक पद्धतीचं सुंदर व टुमदार मंदिर बांधलं असून वैशाख शुद्ध दशमी(ता. २ जून १९६७) रोजी शुभमुहूर्तावर श्री शांतादुर्गा किंवा कालिका माता व श्री मुरलीधर किंवा श्रीकृष्ण या दोन दैवतांची प्रतिष्ठापना करण्यात आली. या दोनही मूर्ती अप्रतिम असून त्यावर सुबक कोरीवकाम पाहायला मिळतं. यातलं शांतादुर्गेचं मंदिर म्हणजे गोव्याच्या शांतादुर्गा मंदिराची हुबेहुब प्रतिकृती आहे. या दोन्ही मूर्ती पूर्वाभिमुख आहेत.

या मठात असलेल्या मंदिराच्या मागच्या एका हॉलमध्ये तीन समाधी असून त्यात मध्यभागी असलेली समाधी श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी यांची आहे. या समाधीच्या डाव्या बाजूला श्रीमत् शिवानंद सरस्वती यांची समाधी असून उजव्या बाजूची समाधी श्रीमत् आत्मानंद सरस्वती स्वामी यांची आहे. या तीनही समाधी श्री गौडपादाचार्यांच्या परंपरेतल्या स्वामींच्या आहेत. या तीनही समाधींचं दर्शन घेतल्यास मनातल्या सर्व इच्छा पूर्ण होतात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

मठामध्ये चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण महिन्यातल्या शुक्ल व वद्य पंचमी साजऱ्या केल्या जातात. याचबरोबर श्रीकृष्ण जन्माष्टमी, श्री गणेशोत्सव, महाशिवरात्र, नवरात्र, त्रिपुरारी पौर्णिमा आदी उत्सव साजरे केले जातात. नवरात्रातले १० दिवस चालणारा नवचंडी होम भक्तांचं विशेष आकर्षण असतं.

mtartedit@gmail.com